क्र.का.४/प्र.क्र.१७९/२०१४/७१८/१६२०
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-१
दिनांक :- ०७/०४/२०१४.

विषय :- अ पत्रके व सि.टी.एस.पत्रके विहीत मुदतीत तहसिलदार / नगरभूमापन अधिकारी यांचे कार्यालयाकडे पाठविणेबाबत.

संदर्भ :- १) या कार्यालयाची परिपत्रके

१) क्र. नोमनि-४/प्र.१५५४/१५६६-१९६६, दि. ०६/११/८६.
२) क्र. नोमनि-४/प्र.१४०२/५१११-५४१७, दि. १७/०८/८९.
३) क्र. नोमनि-४/प्र.१४०२/६३२७-५७, दि. २७/१०/८९.
४) क्र.का.४/संकीर्ण-१९९६/२१६-५७५, दि. २२/०३/९६.
५) क्र.का.४/प्र.क्र.३१८९/८९६-१३२६, दि. ०३/०७/२०००.
६) क्र.का.४/प्र.क्र.३१८९/२००२/१४९३-१५३२,दि.१८/०४/२००२

<u>परिपत्रक</u> :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम १५४ मधील तरतुदीनुसार स्थावर मिळकतीच्या हस्तांतरणाबाबतची सूचना दुय्यम निबंधक यांनी तहसिलदार / नगरभूमापन अधिकारी यांचेकडे पाठविणे बंधनकारक आहे. त्याबाबत सविस्तर सूचना नोंदणी आदेश संहिता ४३१ (अ) मध्ये देण्यांत आल्या आहेत.

याप्रमाणे दुय्यम निबंधक कार्यालयाकडून अ पत्रके तहसिलदार / नगरभूमापन अधिकारी यांचे कार्यालयांकडे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत पाठविली जातात किंवा नाहीत याबाबत तपासणीचेवेळी कटाक्षाने लक्ष ठेवावे, अशा सूचना सर्व सह जिल्हा निबंधक यांना संदर्भित परिपत्रकान्वये देण्यांत आल्या आहेत.

तथापि काही दुय्यम निबंधक कार्यालयाकडून अ पत्रके, सि.टी.एस.पत्रके विहीत मुदतीत संबंधित प्राधिकरणाकडे पाठविली जात नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

हया विलंबामुळे मिळकत हक्क पत्रिकेतील फेरफारविषयक प्रक्रियेस विलंब लागण्याची व पर्यायाने संबंधित पक्षकारास मनस्ताप होण्याची शक्यता निर्माण होते.

<u>तरी सर्व सह जिल्हा निबंधक यांना पुनरपी निर्देश देण्यांत येतात की,</u>

दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदविणेत आलेल्या स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणाचे दस्तऐवजांबाबतची अ पत्रके संबंधित तहसिलदार / नगर भूमापन अधिकारी यांचेकडे विहीत कालावधीत पाठविली जात आहेत यावर योग्यरितीने नियंत्रण ठेवावे, जाणीवपूर्वक दिरंगाई करणाऱ्या दुय्यम निबंधक यांचेविरुध्द् योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यांत यावी.

**सही/-(डॉ.श्रीकर परदेशी)**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रति,

सर्व सह जिल्हा निबंधक (संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक यांचेमार्फत).

प्रत :- सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

**निर्गमित**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे करिता.**

D:\DESK-4-2014\DESK-4-CIRCULAR-2014.doc